**प्रस्तावना** CORNING[1] हे स्पेशल्टी ग्लास व सिरॅमिक्स यांमधील जागतिक नेते आहेत. आम्ही आधारभूत घटक निर्माण करतो व बनवतो ज्यायोगे कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, मोबाईल उत्सर्जन नियंत्रण, टेलीकम्यूनिकेशन्स व जीवन विज्ञान यांच्यासाठी उच्च-तंत्रज्ञान प्रणाल्या बनवणे शक्य होते. आमची व्यवसाय कार्ये करत असताना आम्ही आमचे कर्मचारी, अर्जदार, प्रासंगिक कामगार, ग्राहक, पुरवठादार व अन्य व्यवसाय भागीदार यांच्याशी संबंधित वैयक्तिक डेटा[2] गोळा व प्रक्रिया करतो.

**उद्देश** या धोरणाचा उद्देश CORNING वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करते तेव्हा लागू करते त्या मानकांचे वर्णन करणे हा आहे. ते ज्यांच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया केली जात आहे अशा व्यक्तीविषयक माहितीचे हक्क व हे हक्क ते कसे बजावू शकतात यांचे विशेषत्वाने विवरण देते.

**व्याप्ती** हे धोरण कोणत्याही CORNING अस्तित्वाने किंवा त्याच्या वतीने प्रक्रिया केलेला सर्व वैयक्तिक डेटा, मग असा वैयक्तिक डेटा कोणत्याही स्वरूपात असला तरी, (उदा., इलेक्ट्रॉनिक नोंदी, कागदी फायली, व्हिडिओ रेकॉर्डिंग्ज, इ.) समाविष्ट करते.

**उद्देशित श्रोतृवर्ग** सर्व CORNING अस्तित्वे व सर्व CORNING कर्मचारी आणि प्रासंगिक कामगार यांनी या धोरणाचे पालन करणे आवश्यक आहे. सर्व पुरवठादार[3] व, लागू असेल त्या प्रमाणात, ज्यांच्याकडे CORNING ने किंवा त्यांच्या वतीने वैयक्तिक डेटा सुपुर्द केला आहे असे कोणतेही तृतीय पक्ष[4] यांनी किमान या धोरणात समाविष्ट असलेल्या वैयक्तिक डेटा संरक्षण मानकांच्या समकक्ष मानके लागू असल्याबाबत समाधानकारक खात्री दिली पाहिजे.

**बंधनकारक कॉर्पोरेट नियम (BCRs)** CORNING समूहादरम्यान हस्तांतरण होताना वैयक्तिक डेटाचे संरक्षण होत असल्याची खात्री करण्यासाठी CORNING ने BCRs चा संच अमलात आणला आहे. BCRs ची अंमलबजावणी CORNING ईयू अस्तित्वांकडून जगभर स्थित अन्य CORNING अस्तित्वांकडे होणाऱ्या वैयक्तिक डेटा हस्तांतरणाला[5] पुरेसे संरक्षण देते. BCRs ची तत्त्वे वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासंबंधात किंवा अशा डेटाची मुक्त

---

[1] "CORNING" (वा "आम्ही," "आमचे") – याचा अर्थ असेल Corning Incorporated, एक न्यू यॉर्क कॉर्पोरेशन, ज्यांचे मुख्यालय Corning, NY, USA, येथे आहे व Corning Incorporated यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मालकी वा नियंत्रण असलेल्या त्यांच्या जगातील सर्व उपकंपन्या. इथे वापरल्यानुसार, अस्तित्वाची मालकी वा नियंत्रण यासाठी त्या अस्तित्वाचे डायरेक्टर्स, मॅनेजर्स, सामान्य भागीदार वा समकक्ष अधिकाऱ्यांची निवडणूक वा नियुक्ती करण्यासाठी मतदानाची वा निवडणुकीसाठीच्या अन्य समकक्ष शक्तीची 50 टक्क्यांहून (50%) अधिक स्टॉक वा अन्य स्वारस्ये यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मालकी आवश्यक आहे. हे एकत्रित कॉर्पोरेट कुटुंब येथे काही वेळा "CORNING समूह" असेही संदर्भित करण्यात आले आहे.

[2] "वैयक्तिक डेटा" याचा अर्थ असेल ओळख पटवलेल्या किंवा पटवू शकणाऱ्या नैसर्गिक व्यक्तीबाबतची कोणतीही माहिती ('व्यक्तीविषयक माहिती'); ओळख पटू शकणारी व्यक्ती म्हणजे जिला ओळखता येऊ शकते, खासकरून एका ओळख क्रमांकाचा किंवा त्या व्यक्तीविशिष्ठ असलेल्या शारीरिक, शरीरक्रियाशास्त्रविषयक, मानसिक, आर्थिक, सांस्कृतिक वा सामाजिक ओळख यांसारखा एक किंवा अधिक घटकांचा संदर्भ मिळाल्याने जिची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ओळख मिळू शकते अशी व्यक्ती. जर आणि ज्या प्रमाणात लागू आहेत ते राष्ट्रीय डेटा संरक्षण कायदे ओळख पटवलेली किंवा ओळख पटवण्यायोग्य कायदेशीर अस्तित्वे यांसदर्भातील माहितीचे संरक्षण सुद्धा करत असतील, तर "वैयक्तिक डेटा" या संज्ञेत अशा माहितीचाही समावेश असेल.

[3] पुरवठादार याचा अर्थ Corning ने त्यांच्या बहुसंख्य प्रक्रियाकारांना संदर्भित करण्यासाठी वापरलेली संज्ञा असा असेल. पुरवठादार हे एक कंत्राटाखालील अस्तित्व आहे जे Corning च्या निर्देशांनुसार वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करू शकेल, उदाहरणार्थ पेरोल (वेतनपट) पुरवठादार.

[4] "तृतीय पक्ष" याचा अर्थ व्यक्तीविषयक माहिती सोडून एक नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधिकरण, एजन्सी किंवा बॉडी, नियंत्रक, प्रक्रियाकार व नियंत्रक किंवा प्रक्रियाकार यांच्या थेट अधिपत्याखाली डेटावर प्रक्रिया करण्यास प्राधिकृत व्यक्ती, असा असेल.

[5] "डेटा हस्तांतरण" याचा अर्थ कोणत्याही अस्तित्वाकडून अन्य अस्तित्वाकडे हस्तांतरण होणारा कोणताही वैयक्तिक डेटा असा असेल. हस्तांतरण कोणत्याही दळणवळणाद्वारे केले जाऊ शकते, डेटाबेसमधील प्रवेशासह नेटवर्कद्वारे वैयक्तिक डेटा कॉपी,

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

हालचाल याबाबत व्यक्तींच्या संरक्षणाबाबत ईयू निदेश 95/46/EC दिनांक 24 ऑक्टोबर 1995 शी सुसंगत आहेत ("ईयू निदेश"). समूहादरम्यान वैयक्तिक डेटाचे आंतरराष्ट्रीय हस्तांतरण कायदेशीर करण्याच्या उद्देशाहूनही जास्त म्हणजे, BCRs जगभरात डेटा गोपनीयता पालनासाठी सातत्यपूर्ण व परिणामकारक दृष्टिकोन लागू करण्यास CORNING ला सक्षम करतात. ईयू कायदा फक्त ईयू मध्ये वापरलेल्या व गोळा केलेल्या वैयक्तिक डेटाला लागू होत असला तरी, जेथे CORNING वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करते अशा सर्व केसेसमध्ये CORNING जागतिकरित्या BCRs लागू करते.

BCRs बाबत अधिक जाणण्यासाठी, कृपया येथे भेट द्या: privacy@corning.com.

**प्रकाशन** CORNING प्रत्येक व्यक्तीविषयक माहितीला सद्य धोरण सहज उपलब्ध करून देण्यास बांधील आहे. या उद्देशाने, या धोरणाची सद्य आवृत्ती CORNING च्या इन्ट्रानेटवर व CORNING च्या बाह्य वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात आली आहे.

**सर्वसामान्य नियम**

CORNING तिचे कर्मचारी, अर्जदार, प्रासंगिक कामगार, ग्राहक, पुरवठादार, व्यवसाय भागीदार व ज्यांच्याशी ती संवाद साधते अशा इतरांनी सुपुर्द केलेल्या वैयक्तिक डेटाचे संरक्षण व सुरक्षित जपणूक BCRs मध्ये नमूद केलेल्या तत्त्वांनुसार करण्यास बांधील आहे.

CORNING ची डेटा संरक्षण पद्धती व कार्यक्रम CORNING ची मूल्ये व लागू असलेले कायदे व नियमने याच्याशी सुसंगत असतात. CORNING तिचे पुरवठादार व व्यवसाय भागीदार यांनी त्यांना सुपुर्द केलेल्या वैयक्तिक डेटासाठी डेटा संरक्षण पद्धती किमान CORNING च्या BCRs मध्ये वर्णन केल्याइतकी कडक असणे आवश्यक करते.

**डेटा संरक्षण करण्यासाठी पाया**

CORNING चे वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे[6] खालील मूलभूत डेटा संरक्षण तत्त्वांवर आधारित आहे:

- **वैयक्तिक डेटावर व संवेदनशील वैयक्तिक डेटावर[7] प्रक्रिया करण्यासाठी कायदेशीर पाया**: ईयू निदेश व CORNING चे BCRs.

- **उद्देशाची मर्यादा**: वैयक्तिक डेटा निर्धारित, सुस्पष्ट व कायदेशीर उद्देशांसाठी गोळा केला जाईल व या उद्देशांशी सुसंगत नसलेल्या प्रकारे त्याच्यावर पुढे प्रक्रिया केली जाणार नाही.

- **डेटा गुणवत्ता व प्रमाण**: वैयक्तिक डेटा पुरेसा, सुसंगत असेल व ज्या उद्देशांसाठी गोळा केला आणि/किंवा पुढे प्रक्रिया केला गेला त्यासंदर्भात खूप अधिक नसेल.

- **अचूक व अद्ययावत ठेवलेला**: वैयक्तिक डेटा अचूक व आवश्यक तेथे, अद्ययावत ठेवलेला असेल.

---

हस्तांतरित वा उघड करणे, किंवा एका माध्यमातून दुसऱ्यात हस्तांतरण करणे, मग माध्यमाचे स्वरूप काहीही असो (उदारहणार्थ संगणक हार्ड डिस्कवरून सर्व्हरवर).

6 "वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे" याचा अर्थ म्हणजे गोळा करणे, नोंद करणे, व्यवस्थापन, साठवण, स्वीकृती किंवा बदल, पुनर्प्राप्ती, सल्लामसलत, वापर, पारेषण यांद्वारे प्रगटीकरण किंवा अन्य प्रकारे उपलब्ध केले जाणे, संरेखित करणे किंवा एकत्रीकरण, अडवणे, खोडणे किंवा नष्ट करणे यांसहित वैयक्तिक डेटावर केले गेले असे स्वयंचलितरित्या असलेले किंवा नसलेले कोणतेही कार्य किंवा कार्यांचा संच.

7 "संवेदनशील वैयक्तिक डेटा" याचा अर्थ जातीय किंवा वांशिक मूळ, राजकीय मते, धार्मिक किंवा तात्त्विक विश्वास किंवा कर्मचारी संघटना सदस्यत्व उघड करणारा, व्यक्तीचे आरोग्य किंवा लैंगिक जीवन याबाबतचा डेटा असा असेल.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

- **सुयोग्य डेटा राखणी**: वैयक्तिक डेटा अशा स्वरूपात ठेवला जाईल जे व्यक्तीविषयक माहितीची ओळख तो वैयक्तिक डेटा ज्या उद्देशाने गोळा केला किंवा त्यावर पुढे प्रक्रिया केली त्यासाठी आवश्यक काळाहून अधिक काळ होऊ देणार नाही.

- **स्वयंचलित निर्णय**: व्यक्तीविषयक माहितीना हा हक्क आहे की त्यांनी अशा निर्णयाचा विषय होऊ नये ज्यामुळे व्यक्तीविषयक माहितीसाठी कायदेशीर परिणाम निर्माण होतील किंवा व्यक्तीविषयक माहितीवर लक्षणीय परिणाम होईल व जो व्यक्तीविषयक माहितीची कामामधील कामगिरी, भरवसा, वर्तणूक इ. सारख्या व्यक्तीविषयक माहितीच्या विशिष्ट वैयक्तिक मुद्द्यांच्या तपासणीसाठी असलेल्या वैयक्तिक डेटावर स्वयंचलित प्रक्रिया केल्याने झाला आहे.

- **माहिती हक्क**: वैयक्तिक डेटा नेहमीच पारदर्शक पद्धतीने गोळा व पुढे प्रक्रिया केला गेला पाहिजे.

- **प्रवेश, दुरुस्ती व खोडणे, किंवा वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे थांबवणे व करण्यासाठी हरकत घेणे यांचे हक्क**: CORNING त्यांच्याबाबतचा कोणता वैयक्तिक डेटा अनुरक्षित करते याबाबतची माहिती मिळवण्याचा, व काही मर्यादांसह, प्रवेश, दुरुस्ती व खोडणे, किंवा वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे थांबवणे व करण्यासाठी हरकत घेणे हा हक्क व्यक्तीविषयक माहितीला आहे.

- **सुरक्षितता व गोपनीयता**: वैयक्तिक डेटाचे अपघाती किंवा बेकायदेशीर विध्वंस किंवा अपघाती नुकसान, बदल, विनाअनुमती प्रकटीकरण किंवा प्रवेश, तसेच प्रक्रिया करण्याच्या सर्व बेकायदेशीर स्वरूपांपासून संरक्षण करण्यासाठी सुयोग्य तांत्रिक आणि संघटनात्मक सुरक्षा उपाय लागू केले गेले पाहिजेत.

- **पुरवठादार, तृतीय पक्ष आणि/किंवा तृतीय देशांमध्ये हस्तांतरण:** CORNING ही जागतिक संस्था आहे, जिची जगभरात कायदेशीर अस्तित्वे आहेत आणि सीमा पार करणारे व्यवसाय, आयटी प्रणाल्या, व्यवस्थापन संरचना व प्रक्रिया आहेत. असे असल्याने, CORNING ला अन्य CORNING अस्तित्वे, पुरवठादार, तृतीय पक्ष यांना, त्याच देशात किंवा तो सुरुवातीला पुरवला गेला त्या देशाव्यतिरिक्त अन्य देशांमध्ये, वैयक्तिक डेटा हस्तांतरित करणे आणि/किंवा अन्य देशांमध्ये होस्ट केले असू शकतात अशा डेटाबेसेसमध्ये वैयक्तिक डेटा साठवण्याची वरचेवर गरज असते. डेटा संरक्षणाच्या प्रभावी पातळ्या पुरवण्याच्या, खासकरून युरोपियन इकॉनॉमिक एरिया (ईईए) बाहेर वैयक्तिक डेटा हस्तांतरणासंबंधी प्रयत्नांतर्गत, CORNING ने BCRs या ईयू कायद्याने पुरवलेली तत्त्वे, नियम व साधनांच्या प्रणालीचा स्वीकार केला आहे.

**डेटा संरक्षण तत्त्वे**

**वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासाठी कायदेशीर पाया**

CORNING वैयक्तिक डेटा गोळा व त्यावर प्रक्रिया करतो फक्त जर:

- डेटा प्रयुक्ताने निःसंदिग्ध संमती दिली असेल[8]; किंवा
- व्यक्तीविषयक माहिती पक्ष असलेल्या कंत्राटासाठी किंवा कंत्राट करण्याआधी डेटा सब्जेक्टने विनंती केलेल्या पायऱ्या अनुसरण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा
- CORNING च्या कायदेशीर दायित्वाचे पालन करण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा
- व्यक्तीविषयक माहितीच्या जीवनावश्यक स्वारस्यांचे रक्षण करण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा

---

[8] या धोरणात अन्यत्र व्याख्या न केलेल्या सर्व कॅपिटल संज्ञांना ईयू निदेशात दिलेले अर्थ लागू होतात.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

- लोकहितासाठी केलेल्या कामासाठी किंवा CORNING ला किंवा वैयक्तिक डेटा उघड केला जातो त्या तृतीय पक्षाला दिलेल्या अधिकृत अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक असते; किंवा
- CORNING वा संरक्षण आवश्यक असलेली व्यक्तीविषयक माहितीच्या मूलभूत हक्कांचे व स्वातंत्र्याचे स्वारस्य यांनी अतिक्रमीत होत नसल्यास वैयक्तिक डेटा उघड करण्यात आला आहे असा तृतीय पक्ष नियंत्रकाच्या भूमिकेत असताना कायदेशीर स्वारस्यांच्या जपणुकीसाठी[9] प्रक्रिया करणे आवश्यक असते.

CORNING गुन्हे, गुन्हेगारी अटक वा सुरक्षितता मार्ग यासंबंधातील वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करेल, ज्यांच्या बाबतीत वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे अधिकृत प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली, व लागू राष्ट्रीय कायद्यांनी पुरवलेल्या विशिष्ट सुरक्षितता उपायांना अनुसरून असेल.

**संवेदनशील वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासाठी कायदेशीर पाया**

CORNING संवेदनशील वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करत नाही जोपर्यंत:

- व्यक्तीविषयक माहितीने अशा संवेदनशील वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासाठी निःसंदिग्ध संमती दिली आहे (लागू कायदे प्रतिबंधित करत असतील तेथे वगळता); किंवा
- रोजगार कायदा क्षेत्रात नियंत्रक म्हणून काम करत असलेल्या CORNING अस्तित्वाला बंधने व विशिष्ट हक्क यांचे पालन करण्याकरिता राष्ट्रीय कायदे पुरेशा संरक्षक उपाययोजना पुरवत असतीत तेथवर असे प्रक्रिया करणे आवश्यक आहे; किंवा
- प्रक्रिया करणे त्या व्यक्तीविषयक माहितीच्या जीवनावश्यक हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी किंवा जेथे व्यक्तीविषयक माहिती शारीरिकरीत्या वा कायदेशीररीत्या संमती देण्यास असमर्थ आहे तेथे अन्य व्यक्तीचे जीवनावश्यक हितसंबंध रक्षिण्यासाठी; किंवा
- संवेदनशील वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे कायदेशीर दाव्यांचा अंमल, बचाव किंवा स्थापना करण्यासाठी आवश्यक आहे; किंवा
- प्रक्रिया करणे असा संवेदनशील वैयक्तिक डेटाशी संबंधित आहे जो व्यक्तीविषयक माहितीने जाहीरपणे सार्वजनिक केला आहे.

**उद्देश मर्यादा**

CORNING वैयक्तिक डेटावर निर्धारित, निःसंदिग्ध व कायदेशीर उद्देशांसाठी प्रक्रिया करते व या उद्देशांशी सुसंगत नसलेल्या प्रकारे त्याच्यावर पुढे प्रक्रिया करत नाही. CORNING वैयक्तिक डेटावर स्थानिक डेटा संरक्षण प्राधिकारी (DPA) यांना अतिरिक्त सूचनापत्र आणि/किंवा आवश्यक तेथे व्यक्तीविषयक माहितीला कळवणे किंवा संमती मिळवणे यांसारख्या अतिरिक्त डेटा गोपनीयता आवश्यकतांचे पालन होत असल्याची खातरजमा केल्याशिवाय दुय्यम उद्देशांसाठी (उदा. मार्केटिंग) प्रक्रिया करत नाही.

**डेटा गुणवत्ता व प्रमाणता**

CORNING वैयक्तिक डेटा तिच्या वैध व्यावसायिक स्वारस्यांसाठी आवश्यक तितका, व व्यक्तींचे हक्क लक्षात घेऊन उचित व कायदेशीर मार्गाने गोळा व प्रक्रिया करते.

CORNING वैयक्तिक डेटा गोळा करणे तिच्या व्यावसायिक उद्देशांसाठी सुयोग्य व प्रमाणशीर मर्यादेत ठेवते. CORNING वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करताना तो पुरेसा, सुसंगत असेल व ज्या उद्देशांसाठी गोळा केला आणि/किंवा पुढे प्रक्रिया केला गेला त्यासंदर्भात खूप अधिक नसेल याची खातरजमा करते. गोळा करण्याचे कारण व लागू नियमने यांवर अवलंबून, विशिष्ट उद्देशासाठी गोळा केलेल्या वैयक्तिक डेटाच्या विशिष्ट प्रकारांमध्ये बदल होऊ शकतो. CORNING कडे वैयक्तिक डेटा खूप जास्त प्रमाणात व गोळा करण्याच्या इच्छित उद्देशाशी विसंगत, किंवा

---

[9] “नियंत्रक” याचा अर्थ नैसर्गिक वा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधिकरण, एजन्सी किंवा अन्य कोणतीही बॉडी जी एकटी किंवा इतरांसह एकत्रितपणे वैयक्तिक डेटा प्रक्रिया करण्याचे उद्देश किंवा साधने ठरवतात.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

व्यक्तीविषयक माहितीला पुरवलेल्या माहितीच्या आवाक्याबाहेर प्राप्त झाल्यास, CORNING, योग्य असल्यानुसार, पाठवणाऱ्याकडून वैयक्तिक डेटाचे आणखी खूप जास्त प्रमाणात व विसंगत पारेषण रोखण्यासाठी सुयोग्य पावले उचलेल, व अशा विसंगत व खूप जास्त प्रमाणातील वैयक्तिक डेटावर पुढे प्रक्रिया होऊ नये म्हणून योग्य मार्ग (नष्ट करणे यासारखे) वापरेल.

**अचूक व अद्ययावत**

CORNING प्रक्रिया करत असलेला वैयक्तिक डेटा अचूक असल्याची व आवश्यक तेथे दुरुस्त करून अद्ययावत ठेवला खात्री करण्यासाठी सुयोग्य पावले उचलते. CORNING योग्य असेल त्यानुसार, गोळा करण्याच्या किंवा पुढे प्रक्रिया करण्याच्या उद्देशांसंदर्भात चूक व अपूर्ण असलेला वैयक्तिक डेटा खोडला गेला किंवा सुधारला असल्याची खात्री करण्यासाठी सुयोग्य पावले उचलेल. व्यक्तीविषयक माहिती खाली दिलेल्यानुसार योग्य त्या विभागात दर्शवलेल्या CORNING संपर्क बिंदूंशी संपर्क साधू शकतात. शक्य तेथे, CORNING व्यक्तींना त्यांच्या वैयक्तिक डेटात प्रवेश, दुरुस्ती आणि/किंवा अद्यतन यांसाठी स्वयंचलित मार्गही पुरवेल.

**सुयोग्य डेटा राखणे**

CORNING वैयक्तिक डेटा कायदेशीर व व्यावसायिक जतन आवश्यकतांशी सुसंगत ताब्यात ठेवते. खासकरून, CORNING वैयक्तिक डेटा नष्ट करण्यासाठी वास्तविक पावले उचलते जेव्हा (i) गोळा करण्याच्या इच्छित उद्देशासाठी तो यापुढे आवश्यक नाही, आणि/किंवा (ii) लागू कायद्यानुसार (असल्यास) अनुमत कमाल जतन कालावधी उलटला आहे.

**स्वयंचलित निर्णय**

प्रत्येक डेटा सब्जेक्टला स्वयंचलित निर्णयांना तोंड न द्यावे लागण्याचा हक्क आहे याची खात्री करण्यासाठी CORNING सुयोग्य पावले उचलते.

**माहिती हक्क**

CORNING वैयक्तिक डेटा तिच्या वैध व्यावसायिक स्वारस्यांसाठी आवश्यक तितका, व मर्यादेशिवाय, त्या व्यक्तीबाबतच्या गोळा केलेल्या व राखलेल्या वैयक्तिक डेटाबाबत माहीत होण्याचा हक्काच्या समावेशासहित, व्यक्तींचे हक्क लक्षात घेऊन उचित व कायदेशीर मार्गाने वैयक्तिक डेटा गोळा व प्रक्रिया करते.

व्यक्तीविषयक माहितीकडे आधीच ती असेल ते वगळता, CORNING व्यक्तीविषयक माहिती किमान खालील माहिती पुरवते:

- नियंत्रकाची व, असल्यास, नियंत्रकाच्या प्रतिनिधीची ओळख व, योग्य तेव्हा, EEA बाहेर नियंत्रक स्थित असलेले ठिकाण;
- वैयक्तिक डेटा ज्यासाठी आहे तो प्रक्रिया करण्याचे उद्देश, व, योग्य तेथे, EEA बाहेर हस्तांतरण करण्याचा(चे) उद्देश;
- कोणतीही अधिक माहिती उदाहरणार्थ:
    - संबंधित वैयक्तिक डेटाचे प्रवर्ग;
    - वैयक्तिक डेटाचे प्राप्तकर्ते किंवा प्राप्तकर्ता[10] प्रवर्ग;
    - प्रश्नांना उत्तरे बंधनकारक आहेत किंवा ऐच्छिक, तसेच प्रश्नावलीच्या संदर्भात उत्तर न दिल्याने संभाव्य परिणाम;
    - वैयक्तिक डेटात प्रवेश मिळवण्याच्या व वैयक्तिक डेटा बदल, खोडणे किंवा तिच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे अडवण्याच्या व त्याला हरकत घेण्याच्या हक्काचे अस्तित्व.

---

[10] "प्राप्तकर्ता" याचा अर्थ नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधिकरण, एजन्सी किंवा अन्य कोणतीही बॉडी जिला डेटा उघड केला जातो, तृतीय पक्ष असो किंवा नसो; तथापि, प्राधिकरणे ज्यांना विशिष्ट चौकशीच्या चौकटीत डेटा प्राप्त होईल, त्यांना प्राप्तकर्ते मानले जाणार नाही.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

वैयक्तिक डेटा व्यक्तीविषयक माहितीकडून थेट मिळवलेला नसेल तेथे, व्यक्तीविषयक माहिती वरील माहिती वैयक्तिक डेटाचे रेकॉर्डिंग करतेवेळी किंवा तृतीय पक्षाकडे उघड होण्याच्या शक्यतेत, वैयक्तिक डेटा सर्वप्रथम उघड होण्याच्या तारखेनंतर नाही, अशा वेळी CORNING पुरवते.

व्यक्तीविषयक माहितीसाठी माहिती कळवण्याचे बंधन लागू होणार नाही जर (i) अशी माहिती पुरवणे अशक्य सिद्ध झाले, किंवा (ii) यासाठी प्रमाणाबाहेर प्रयत्न लागेल किंवा (iii) असे रेकॉर्डिंग किंवा प्रकटीकरण कायद्याने अत्यावश्यक आहे.

**प्रवेश, दुरुस्ती व खोडणे, किंवा वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे थांबवणे व करण्यासाठी हरकत घेणे यांचा हक्क:**
प्रत्येक व्यक्तीविषयक माहितीला CORNING कडून हे प्राप्त करण्याचा हक्क आहे:

- मर्यादेशिवाय, वाजवी कालावधींदरम्यान, व मर्यादेबाहेर उशीर किंवा खर्च न करता, व लागू असेल तेथे, राष्ट्रीय कायद्यांबरहुकूम:
    - व्यक्तीविषयक माहितीसंबंधी वैयक्तिक डेटावर प्रक्रिया केली जात आहे किंवा नाही याची पुष्टी, व किमान प्रक्रिया करण्याच्या उद्देशांची, संबंधित डेटाचे प्रवर्ग व प्राप्तकर्ते किंवा प्राप्तकर्त्यांचे प्रवर्ग ज्यांना वैयक्तिक डेटा उघड केला आहे याची माहिती;
    - प्रक्रिया केली जात असलेल्या वैयक्तिक डेटासंबंधी व्यक्तीविषयक माहितीला सुगम स्वरूपात दळणवळण व कोणतीही उपलब्ध माहिती, स्त्रोतांसह;
    - कोणत्याही स्वयंचलित निर्णयांमागे असलेल्या लॉजिकचे ज्ञान.
- योग्य असल्यानुसार, वैयक्तिक डेटाच्या अपूर्ण किंवा चुकीच्या स्वरूपामुळे वैयक्तिक डेटाची सुधारणा किंवा खोडणे;
- व्यक्तीविषयक माहितीच्या विशिष्ट परिस्थितीशी संबंधित भाग पाडणाऱ्या कायदेशीर स्थितींमध्ये कधीही थेट मार्केटिंगच्या उद्देशांनी होणाऱ्या व्यक्तीविषयक माहितीशी संबंधित वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे अडवणे व करण्यासाठी हरकत घेणे.

प्रवेश, दुरुस्ती व खोडणे, किंवा वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे थांबवणे व करण्यासाठी हरकत घेणे यांचे हक्क व्यक्तीविषयक माहिती पुरवण्यासंबंधी भूमिका व जबाबदाऱ्या यांचे वर्णन करण्यासाठी प्रक्रिया CORNING मध्ये स्थापित आहे.

व्यक्तीविषयक माहितीच्या विनंत्या स्थानिक पातळीवर एकतर स्थानिक डेटा संरक्षण अधिकारी (LDPO), मानव संसाधन (एचआर) निर्देशित संपर्क, जागतिक पुरवठा व्यवस्थापन (GSM) प्रतिनिधी, विक्री किंवा मार्केटिंग प्रतिनिधी व ग्राहक सेवा प्रतिनिधी यांच्याकडे प्रत्येक CORNING स्थानिक वेबसाईटवर आढळणाऱ्या. पोस्टल मेल, व्यक्तीशः, दूरध्वनीद्वारे किंवा ईमेलद्वारे सादर करू शकतात.

उघडपणे अवास्तव असलेल्या, खासकरून त्यांची संख्या, किंवा त्यांचे पुनरावृत्ती होणारे घटक यांमुळे, अशा विनंत्यांना CORNING हरकत घेऊ शकेल.

**सुरक्षितता व गोपनीयता**
CORNING ने ती गोळा करत असलेला व ठेवत असलेला वैयक्तिक डेटा गोपनीय ठेवण्यासाठी व अनधिकृत वा बेकायदेशीर प्रकटीकरण किंवा प्रवेश, अपघाती हानी, विध्वंस, बदल किंवा मोडतोड यांपासून त्याचे संरक्षण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व अंमलबजावणीचा खर्च लक्षात घेऊन सुयोग्य व वाणिज्यिकरित्या वास्तव असलेली तांत्रिक आणि संघटनात्मक सुरक्षा उपाय पावले उचलली आहेत. या उपाययोजनांचा उद्देश संरक्षित करण्याच्या वैयक्तिक डेटावरील प्रक्रिया व स्वरूप यांमधील अंगभूत जोखमींसंबंधात सुयोग्य पातळीच्या सुरक्षिततेची डेटा संरक्षणासंबंधीच्या लागू कायद्यांमधील सुरक्षितता आवश्यकतांशी सुसंगत रीतीने खात्री करणे हा आहे.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

CORNING तिच्या ज्या पुरवठादारांना वैयक्तिक डेटासाठी प्रवेश दिला आहे त्यांची डेटा संरक्षण पद्धती किमान CORNING ने लागू केल्याइतकी कडक असल्याची खातरजमा करण्यासाठी सुयोग्य उपाययोजना करते.

**पुरवठादार, तृतीय पक्ष आणि/किंवा तृतीय देशांकडे हस्तांतरणे**

CORNING अस्तित्वांकडे हस्तांतरणे: एका CORNING अस्तित्वाकडून अन्य CORNING अस्तित्वाकडे वैयक्तिक डेटाच्या हस्तांतरणाला फक्त तेव्हाच परवानगी दिली जाईल जेव्हा हस्तांतरण विशिष्ट व कायदेशीर व्यवसाय उद्देशावर आधारलेले असेल व प्राप्तकर्ता अस्तित्व हे धोरण व BCRs व हस्तांतरणाला व (त्यापुढील हस्तांतरणासहित) त्यानंतरच्या कोणत्याही प्रक्रिया करण्याला लागू असणारे कोणतेही अधिक कडक स्थानिक कायदे यांच्या अनुपालनाची खात्री देतील. BCRs मध्ये पुरवल्यानुसार, जेव्हा एक CORNING अस्तित्व त्याच्यातर्फे अन्य CORNING अस्तित्वाला वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्याची विनंती करते तेव्हा प्रक्रिया करण्याची विनंती प्राप्त करणाऱ्या CORNING अस्तित्वाने अशा प्रक्रियेसाठी असलेले तांत्रिक आणि संघटनात्मक सुरक्षा उपाय लागू करण्याची हमी देणारे अन्य CORNING अस्तित्व निवडले पाहिजे व या उपायांचे पालन करण्याची खातरजमा केली पाहिजे. BCRs ने बंधित कोणतेही CORNING अस्तित्व प्रक्रियाकार[11] म्हणून अन्य CORNING अस्तित्वाच्या वतीने काम करताना त्या पुरेशा हम्या पुरवण्याचे व BCRs मध्ये असलेले सर्व सुरक्षितता उपाय पाळण्याचे, खासकरून वैयक्तिक डेटाचे हस्तांतरण करणाऱ्या CORNING अस्तित्वाने पुरवलेल्या सूचनांचे पालन करण्याचे व वैयक्तिक डेटाचे अपघाती किंवा बेकायदेशीर विध्वंस किंवा अपघाती नुकसान, बदल, विनाअनुमती प्रकटीकरण किंवा प्रवेश यांपासून पुरेसे संरक्षण देण्यासाठी तांत्रिक आणि संघटनात्मक सुरक्षा उपाययोजना करण्याचे मान्य करते.

CORNING समूहाबाहेरील अस्तित्वांकडे हस्तांतरण:

-पुरवठादार: CORNING ने पुरवठादारांशी लेखी करार केला किंवा करणार आहे ज्यायोगे ते CORNING च्या सूचनांबरहुकूम वैयक्तिक डेटा प्रक्रिया करतील, व सुयोग्य संरक्षण पातळीची खातरजमा करण्यासाठी सुयोग्य सुरक्षितता व गोपनीयता उपायांची संरचना व अनुरक्षण करतील.

त्याव्यतिरिक्त, CORNING ला अशा पुरवठादारांकडून (i) या धोरणात असलेल्या मानकांशी किमान समकक्ष मानके लागू केल्याची व (ii) पुरवठादारांनी डेटा संरक्षणासंबंधीचा लागू कायद्यांचे, खासकरून वैयक्तिक डेटा हस्तांतरणासाठी व कोणत्याही त्यापुढील हस्तांतरणासाठी लागू असलेल्यांचे, अनुपालन केल्याच्या समाधानकारक ग्वाहीची आवश्यकता असेल. अशा पुरवठादारांना वैयक्तिक डेटामध्ये प्रवेश केवळ त्यांच्या लागू असलेल्या सेवा कंत्राटांमध्ये निर्धारित सेवा देण्यासाठीच्या उद्देशांसाठीच असेल. पुरवठादार या बंधनांची पूर्तता करत नाही असा निष्कर्ष एखाद्या CORNING अस्तित्वाने काढल्यास, ते शीघ्रतेने योग्य कारवाई करेल. आणखी, CORNING EU बाहेरील पुरवठादारांना तोपर्यंत वैयक्तिक डेटा हस्तांतरित करत नाही जोपर्यंत त्यांनी वैयक्तिक डेटाचे संरक्षण करण्यासाठी संबंधित EU गोपनीयता आवश्यकतांनुसार सुयोग्य गोपनीयता व सुरक्षितता नियंत्रणे (उदाहरणार्थ जर ते अशा देशांमध्ये स्थित आहेत जो सुयोग्य गोपनीयता व सुरक्षितता नियंत्रणे पुरवत नसल्यास फेब्रूवारी 5, 2010 रोजी EU कमिशनने संमत केलेली EU प्रमाण कंत्राट कलमे (c2010/0593) पुरवठादाराने सही केली आहेत, हे निर्धारित करण्यात येत आहे की अशा कलमांवर CORNING व EU बाहेरील पुरवठादार यांच्यादरम्यान सही केली जाईल).

- तृतीय पक्ष: CORNING अस्तित्वांना विशिष्ट वैयक्तिक डेटा तृतीय पक्षांना उघड करणे आवश्यक असू शकते. खासकरून, असे प्रकटीकरण लागू कायद्यांचे पालन करण्यासाठी (उदा., कर प्राधिकरणांकडे पगार डेटाचे प्रकटीकरण) किंवा जेव्हा व्यक्तीविषयक माहितीचे आरोग्य किंवा सुरक्षितता धोक्यात आहे तेव्हा (उदा., अपघात घडतो तेव्हा) आवश्यक असू शकते. CORNING तिच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्यासाठीही वैयक्तिक डेटा उघड करू शकेल (उदा., न्यायालयीन वादामध्ये).

---

[11] “प्रक्रियाकार” याचा अर्थ नैसर्गिक वा कायदेशीर व्यक्ती, सार्वजनिक प्राधिकरण, एजन्सी वा अन्य कोणतीही बॉडी जी नियंत्रकाच्या वतीने वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करते. सेफ हार्बर परिभाषेतील समकक्ष संज्ञा आहे एजंट; एजंट हा नियंत्रकाच्या वतीने व त्याच्या सूचनांनुसार एजंट म्हणून काम करणारा एक तृतीय पक्ष आहे.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

**या धोरणाचे पालन करण्यासाठी बांधिलकी व अमलात आणलेली साधने**
CORNING ने जागतिक डेटा गोपनीयता कार्यालय स्थापित केले असून ते या धोरणाशी सुसंगतता तपासण्यासाठी व CORNING अस्तित्वे व कर्मचारी प्रक्रिया करत असलेल्या वैयक्तिक डेटावर लागू होणारे BCRs, कायदे, आवश्यकता व कंत्राट करार यांच्या अनुपालनाची खात्री करण्यास मदत करणारे कार्यक्रम वेळोवेळी अनुरक्षित करते.

आमचे धोरण व BCRs बिनचूक, सर्वसमावेशक, ठळकपणे प्रदर्शित, संपूर्णपणे कार्यान्वयित व उपलब्ध असल्याची तपासणी करण्यास CORNING ला सक्षम करणारी वेळोवेळचे कार्यक्रम व लेखापरीक्षणे अशा कार्यक्रमात समाविष्ट असतात.

CORNING ने जागतिक डेटा गोपनीयता अधिकारी (GDPO) नियुक्त केला असून या धोरणाशी व BCRs शी तसेच हे धोरण व BCRs आणि संबंधित धोरणे व कार्यपद्धती यांकरिता आवश्यक असलेली कोणतीही उत्क्रांती सुरू व समन्वयित करण्यास तो जबाबदार आहे. CORNING चा GDPO CORNING च्या प्रमुख माहिती सुरक्षितता अधिकाऱ्याला (CISO) अहवाल देतो.

**दावे हाताळणी व अंमलबजावणी यंत्रणा**
ही धोरणे व BCRs यांच्याशी सुसंगत नसलेल्या कोणत्याही प्रकारे वैयक्तिक डेटात प्रवेश, प्रक्रिया किंवा वापर झाल्यास, CORNING अस्तित्वे सुयोग्य उपाययोजक कृती करतील, ज्यात लागू कायद्यांनुसार शिस्तभंग निर्बंधांचा समावेश असू शकेल.

व्यक्तीविषयक माहितीला असा विश्वास असेल की BCRs वा या धोरणाचे उल्लंघन झाले आहे ज्यात BCRs किंवा या धोरणाशी विसंगत प्रकारे त्याचा वैयक्तिक डेटा प्रक्रिया केला गेला, तर खाली वर्णन केल्यानुसार व्यक्तीविषयक माहिती तक्रार करू शकतो.

व्यक्तीविषयक माहितीकडून प्राप्त गोपनीयता तक्रारींची हाताळणी व गोपनीयता तक्रारींची नोंद, तपास व प्रतिसाद यांसंबंधी भूमिका व जबाबदाऱ्या यांचे वर्णन करण्यासाठी कार्यपद्धती CORNING मध्ये स्थापित आहे.

प्रत्येक CORNING अस्तित्वाची तिच्या इंटरनेट संकेतस्थळावर व्यक्तीविषयक माहितीच्या तक्रारी देण्यासाठी योग्य ती टूल्स आहेत ज्यांमध्ये खालीलपैकी किमान एकाचा समावेश आहे:
- तक्रार फॉर्मसाठी वेब लिंक,
- ईमेल पत्ता,
- टेलीफोन क्रमांक, किंवा
- पोस्टल पत्ता.

**कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या गोपनीयता तक्रारी**
CORNING कर्मचारी त्यांच्या गोपनीयता तक्रारी गोपनीयता तक्रार फॉर्म जी CORNING चे इन्ट्रानेट व CORNING वेबसाईटवरील बाह्य फेसिंगवर उपलब्ध आहे, तिच्याद्वारे सादर करू शकतात. गोपनीयता तक्रार फॉर्म पूर्ण केल्यानंतर, तो फॉर्म खालील पद्धतींनी पाठविता येऊ शकेल:

- ईमेल, पोस्टल मेल, वा स्थानिक डेटा संरक्षण अधिकारी (LDPOs) वा एचआर निर्देशित संपर्क यांच्याकडे व्यक्तिगतरित्या पोचवणे.
- Corning डेटा गोपनीयता कार्यालय (CDPO) मेलबॉक्स, privacy@corning.com ला ईमेल.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.

**अन्य व्यक्तीविषयक माहिती (उदा., प्रासंगिक कामगार, पुरवठादार, ग्राहक) यांनी सादर केलेल्या गोपनीयता तक्रारी**
अन्य व्यक्तीविषयक माहितीच्या गोपनीयता तक्रारी गोपनीयता तक्रार फॉर्म जी CORNING वेबसाईटवरील बाह्य फेसिंगवर उपलब्ध आहे, तिच्याद्वारे सादर करू शकतात. गोपनीयता तक्रार फॉर्म पूर्ण केल्यानंतर, तो फॉर्म खालील पद्धतींनी पाठविता येऊ शकेल:

- ईमेल, पोस्टल मेल, वा LDPOs, ग्राहक सेवा प्रतिनिधी, GSM प्रतिनिधी किंवा विक्री व मार्केटिंग प्रतिनिधीला वैयक्तिकरित्या पोहोचवणी.
- CDPO मेलबॉक्स, privacy@corning.com ला ईमेल.

एखादी तक्रार नोंदली गेल्यानंतर, तिची पोचपावती दिली गेली पाहिजे व वास्तव कालावधीत ती हाताळली गेली पाहिजे (तीन महिने, कायदेशीर मुद्द्यांवर व केसच्या अवघडपणाच्या पातळीवर अवलंबून नूतनीकरण करण्याजोगे).

व्यक्तीविषयक माहितीला स्थानिक व जागतिक पातळीवर पुरवलेली उत्तरे समाधानकारक वाटत नसल्यास, संबंधित DPA आणि/किंवा संबंधित CORNING अस्तित्व स्थापित असलेल्या सक्षम कार्यक्षेत्राकडे तक्रार करण्याचा त्याला हक्क आहे. संबंधित DPA वा सक्षम कार्यक्षेत्राकडे तक्रार वर्ग करण्याअगोदर प्रत्येक पक्षाने वर वर्णिलेल्या अंतर्गत तक्रार सुविधेद्वारे ती सोडवण्याचा सर्वोत्तम प्रयत्न केला पाहिजे.

**CORNING संपर्क बिंदू**
हे धोरण, वा कोणत्याही तक्रारी, विनंत्या (प्रवेश, आक्षेप किंवा दुरुस्ती विनंत्या) यांवरील कोणत्याही प्रश्नांसाठी, GDPO शी privacy@corning.com वर संपर्क साधण्यासाठी आम्ही तुम्हाला उत्तेजन देतो.

तुम्ही CORNING कर्मचारी असल्यास, तुम्ही तुमच्या स्थानाच्या किंवा विभागाच्या स्थानिक डेटा संरक्षण अधिकारी किंवा HR निर्देशित संपर्काशी संपर्क साधू शकता.

**सुधारणा**
या धोरणात वेळोवेळी सुधारणा होऊ शकते. या धोरणाची नवीनतम आवृत्ती इन्ट्रानेट व बाह्य वेबसाईटवर पोस्ट केली जाईल व योग्य असल्यानुसार कर्मचाऱ्यांना वितरितही (हार्ड कॉपी वा इलेक्ट्रॉनिक आवृत्ती) केली जाऊ शकेल.

© 2015 Corning Incorporated. All Rights Reserved.